सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन


**जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**

**कॅम्प अमरावती ४४४ ६०२**

**(गृह विभाग)**

☎: ०७२१-२६६२०२५/२६६२४९३    फॅक्स : ०७२१-२६६२८४३

Email:- homebranch.collamt@gmail.com    Website :- www.amravati.nic.in


क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि- 271 /२०२०    दिनांक :- 14 /०४/२०२०

**वाचा :-**

१.आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५

२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७

३. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-२४६/२०२०दि. २३/०३/२०२०

४. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२१/नै.आ./अका/कावि-११२/२०२० दि. २८/०३/२०२०

५. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-२४८/२०२० दि. ३१/०३/२०२०

६. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-२६२/२०२० दि. ११/०४/२०२०

७. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचनापत्र No.DMU/२०२०/CR.९२/DisM-I, दिनांक १३ एप्रील २०२०

## आदेश

ज्या अर्थी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशात तसेच राज्यामध्ये प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत. कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना एक भाग म्हणुन नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी अमरावती जिल्हयातील गर्दीच्या ठिकाणी विषाणू एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्ती पर्यंत पसरु नये तसेच अमरावती शहर व ग्रामीण जिल्हयात अशा वेळी लोकांमध्ये वेगवेगळे तर्क वितर्क निर्माण होऊन सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था भंग होणार नाही याकरीता नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने अमरावती जिल्हयामधील शहरी व ग्रामीण भागांमध्ये वाचा क्र. ३ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) नुसार संचारबंदीचे आदेश पारीत करण्यात आले आहे. तसेच संदर्भिय क्र. ४ अन्वये जिवनावश्यक वस्तु व त्या संबंधित असलेले किरकोळ, घाऊक व अत्यावश्यक सेवा विक्रेते यांची सेवा ही उक्त आदेशात नमुद केल्याप्रमाणे सकाळी ८.०० ते २.०० वा. पर्यंत सुरु राहील असे आदेशीत करण्यात आले तसेच संदर्भिय क्र. ३ च्या आदेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे अमरावती जिल्हयाच्या सिमेवरुन प्रवेश करणाऱ्या वाहनांना नाकाबंदी करुन प्रतिबंध करण्याबाबत दिलेल्या सूचना हया सुध्दा दिनांक ०१ एप्रील २०२० ते दिनांक १४ एप्रील २०२० पर्यंत लागू राहतील असे नमुद करण्यात आले. संदर्भिय क्र. ३ अन्वये पारीत केलेल्या आदेशाची मुदत ही दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत होती तथापी लॉकडाऊन हा दिनांक १४ एप्रील २०२० पर्यंत असल्याने संदर्भिय क्र. ३ च्या आदेशामध्ये नमुद करण्यात आलेले सर्व मुददे व सूचना या तशाच कायम ठेऊन त्याचा कालावधी हा दिनांक ०१ एप्रील २०२० ते १४ एप्रील २०२० पर्यंत संदर्भिय क्र. ५ अन्वये वाढविण्यात आला होता.



Scanned by CamScanner

परंतु दिवसेंनदिवस कोरोना चा प्रार्दुभाव वाढत असल्याने महाराष्ट्र शासनाने पुन:श्च संदर्भिय क्र. ७ च्या सुचनापत्रान्वये लॉकडाऊन चा कालावधी हा दिनांक ३० एप्रील २०२० पर्यंत वाढविलेला असल्याने अमरावती जिल्हयामधील शहरी व ग्रामीण भागांमध्ये संदर्भिय क्र. ३ व ५ अन्वये पारीत करण्यात आलेले सदर संचारबंदीचे आदेश हे यापुढे दिनांक ३० एप्रील २०२० पर्यंत कायम राहतील याची संबंधितांनी नोंद घेऊन त्या प्रमाणे आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांना सदरचे आदेश तात्काळ अंमलबजावणीकरीता निर्गमित करावे. संदर्भिय क्र. ३ व ५ च्या आदेशान्वये वगळण्यात आलेली दुकाने व प्रतिष्ठाने या आदेशाव्दारे सुध्दा वगळण्यात येत आहे. संदर्भिय क्र. ४ अन्वये घाऊक, किरकोळ, अत्यावश्यक सेवा विक्रेते यांना वेळ निश्चित करण्याबाबत देण्यात आलेले आदेश हे सुध्दा त्यामधील दिलेल्या मुददे व सूचना कायम ठेऊन दिनांक ३० एप्रील २०२० पर्यंत वाढविण्यात येत आहे. उक्त संदर्भिय क्र. ४ मध्ये वाहतूक सेवा संबंधी व वाहतूक पासेस संबंधी दिलेले निर्देश हे सुध्दा कायम ठेऊन त्यांची मुदत दिनांक ३० एप्रील २०२० पर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यामुळे संचारबंदीचा कालावधी हा दिनांक ३० एप्रील २०२० पर्यंत वाढविलेला असल्याने अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील संदर्भिय क्र. ३ व ५ च्या आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता-१८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानुन उपरोक्त आदेश तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संस्था, संघटना यांचेवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास संदर्भिय क्र. ६ अन्वये प्राधिकृत करण्यात आले आहे. सदरचे आदेश सुध्दा कायम ठेवण्यात येत असून त्याची मुदत ही दिनांक ३० एप्रील २०२० पर्यंत वाढविण्यात येत आहे. सदर संचारबंदीच्या कालावधीमध्ये जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवेमध्ये समाविष्ट असलेले किराणामाल, धान्य दुकाने, दुध, दुग्धजन्य पदार्थ, फळे, भाजीपाला, अंडी, मास, मासेए पशुखादय, कृषीसेवा केंद्र संबंधी सर्व दुकाने ही संदर्भिय क्र. ४ च्या आदेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे दररोज सकाळी ८.०० ते दुपारी २.०० वा. पर्यंत या कालावधीत सुरु राहतील.

सदरचे संचारबंदीचे आदेश हे दिनांक १५/०४/२०२० चे ००.०० वा. पासून ते ३०/०४/२०२० चे २४.०० वा. पर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील. सदरहू आदेश आज दिनांक १४/०४/२०२० रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला.

या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती होण्याकरीता ध्वनीक्षेपकाव्दारे Public Address System व्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.

(शैलेश नवाल) १४/४

**जिल्हादंडाधिकारी अमरावती**

**प्रतिलिपी:-**

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.

२. पोलीस आयुक्त (शहर) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीस.

**/- पोलीस विभागाने याबाबत ध्वनीक्षेपकावरुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करुन आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.**

३. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

**/- पोलीस विभागाने याबाबत ध्वनीक्षेपकावरुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करुन आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.**

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.

५. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.



Scanned by CamScanner

६. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
८. अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
९. पोलीस वाहतूक शाखा (शहर/ग्रामीण) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१०. उपविभागीय दंडाधिकारी ----------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
११. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अमरावती ----------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.
१२. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत ----------------------(सर्व) यांना माहितीव कार्यवाहीस
१३. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती यांना माहिती व उचित प्रसिध्दीकरीता रवाना.
**/- सदर आदेशास अमरावती जिल्हयामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**
१४. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१५. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१६. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
१७. व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय,नागपुर यांना माहिती करीता तथा शासकिय राजपत्रात वरील आदेशाची प्रसिध्द करुन ५ प्रती या कार्यालयास सादर करण्यात यावा.
१८. संबंधित सर्व विभाग ------------------------------यांना माहिती व कार्यवाहीकरीता.

DISTRICT MAGISTRATE AMRAVATI. सत्यमेव जयते

**जिल्हादंडाधिकारी अमरावती**



Scanned by CamScanner